# Joint Directorate, Higher Education, Nagpur Region, Nagpur.

# कार्यालयाची माहिती व कर्तव्ये

१) **कार्यालयाचे नांव व** : सहसंचालक उच्च शिक्षण, नागपूर विभाग, नागपूर.

**पत्ता** : जुने मॉरिस कॉलेज इमारत, सिव्हील लाईन्स, नागपूर.

(दुरध्वनी क्र.२५६१७१३, फॅक्स क्र.०७१२-२५५४२१०)

२) **कार्यालयाबाबत माहिती** :- राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नीत महाविद्यालये यांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. तथापि, या संस्थांच्या नियंत्रणाच्या दृष्टीने उच्च शिक्षण संचालनालयातील कर्मचारी वर्गात आवश्यक ती वाढ झालेली नाही. शासनाच्या शैक्षणिक योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी व राज्यातील उच्च शिक्षण संस्था सुरळीतपणे चालू रहाव्या व उच्च शिक्षणाचा दर्जा टिकून राहावा यासाठी प्रशासनाचे संनियंत्रण व पर्यवेक्षणाचे दृष्टीने उच्च शिक्षण संचालनालयाचे बळकटीकरण करण्यासाठी शासन निर्णय दिनांक १७ मे, १९९४ नुसार सदर कार्यालयाची प्रादेशिक स्तरावर स्थापना करण्यात आलेली आहे.

**३)कार्यक्षेत्र** :- नागपूर विभागातील नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्हयातील शासकीय संस्था/महाविद्यालये/वसतीगृहे तथा अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, जि. नागपूर येथील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे संनियंत्रण व अधिनस्त शासकीय वर्ग-३ व ४ चे आस्थापनाविषयक संपूर्ण अधिकार.

**४)संलग्न महाविद्यालये** :- अकृषी विद्यापीठे व त्यांचे अधिनस्त अनुदानित/विनाअनुदानित तसेच कायम विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान,विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये तथा अधिनस्त शासकीय संस्था/महाविद्यालये व वसतीगृहे.